# सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

प्रादेशिक कार्यालय, शासकीय तंत्र निकेतन परीसर, सदर, नागपूर.

E-mail:ronagpur.dte@gmail.com Web:- rdtenagpur.org.in

दुरध्वनी क्र.२५६५१४३ फॅक्स कं. ०७१२–२५६१६६३


क्रमांक :–तंशिस/प्राकाना/शैवि२/जिकौविकास /२०१२/1094

दि. 10 APR 2013

प्रति,
प्राचार्य,

सर्व पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी संस्था.

विषय :– कौशल्य विकास कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी बाबत.

संदर्भ :– १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. ११/तंशिस/२०१२/३३, दि.०१/१०/२०१२.
२) या कार्यालयाचे पत्र क. तंशिसं/प्राकाना/शैवि–२/जिकौविकास/२०१३/१०८३, दि. ०९/०४/२०१३.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्र. २ याचे अवलोकन करावे. पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे मा.पंतप्रधान यांच्या पंधराकलमी कार्यक्रमानुसार कौशल्य विकास कार्यक्रमाची महाराष्ट्र राज्यामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करावयाची आहे. याकरिता तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांना ४०,००० युवकांना दरवर्षी प्रशिक्षित करण्यांचे उध्द्दीष्ट देण्यांत आलेले आहे. सदरचे उध्द्दीष्टे प्रत्येक विभागामध्ये विभागून देण्यांत आलेले आहे. नागपूर विभागीय कार्यालयास ६,००० युवकांना प्रशिक्षित करण्याचे उध्दीष्ट देण्यांत आलेले आहे. सदर उपक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यांच्या दृष्टीने वाजवी फी आकारुन व आपणांकडे उपलब्ध असलेल्या यंत्रसामुग्री व साधनसामुग्री यांचा प्रशिक्षणाकरिता वापर करुन अल्पमुदतीचे अभ्यासक्रम निरंतर प्रशिक्षण योजनेतंर्गत राबविण्यांत यावे असे आपणांस सूचित करण्यांत आलेले होते. पण आपणातर्फे उपरोक्त कार्यक्रमाची अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही कारण प्रशिक्षणाचा अहवाल या कार्यालयास अप्राप्त आहे.

तंत्रशिक्षण, विभागिय कार्यालय, नागपूर यांना दिलेल्या उध्द्दीष्ट पूर्ती करिता, या पत्राद्वारे आपणांस १५० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाचे उध्द्दीष्टे देण्यांत येत असून, पुढील सहा महिन्यात पूर्ण करण्यांत यावे व खाली दिलेल्या प्रपत्रामध्ये माहिती प्रशिक्षण संपल्याबरोबर त्वरीत सादर करावी.

प्रपत्र

| अ.क्र | प्रशिक्षणाचे नांव | प्रशिक्षणाचा कालावधी | प्रशिक्षणार्थीची संख्या | |
|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली |
| | | | | |

( गुलाबराव ठाकरे )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,
नागपूर.